# देशांतर्गत बलात्कार समस्यांचे विश्लेषण

**सुशिल भिमराव बनसोडे**
सहाय्यक प्राध्यापक
चिंतामनराव व्यापार महाविद्यालय, सांगली

**आरती विष्णु पवार**
बी. कॉम. विद्यार्थी
चिंतामनराव व्यापार महाविद्यालय, सांगली

गोषवारा

भारताची संस्कृती हि पुरुषप्रधान संस्कृती म्हणून ओळखली जाते. आज हि संस्कृती बदललेली आहे, असं जरी म्हटलं तरी मग असा प्रश्न उभा राहतो कि, आज मुलगा - मुलगी मध्ये समानता दिसत नाही. आजही मुली सुरक्षित नाहीत. त्याच्यावर होणाऱ्या बलात्काराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. खरंच हि शोकांकतेचीबाब आहे.

या सर्व गोष्टीचा विचार करून, या संशोधनामध्ये काही उद्देश ठेवले. भारतातील वाढत्या बलात्काराची संख्यावर अभ्यास करणे, व भारतातील राज्यामध्ये होणाऱ्या बलात्काराचे मूल्यमापन करणे. आणि सरकारने बलात्कार थांबवण्यासाठी राबवलेल्या योजनाचा अभ्यास करणे.

यावर सरकारने काही उपाययोजना केलेल्या आपल्याला दिसतात. त्यामध्ये सरकरने काही कलम बदलून नवीन काही कलम सुरु केले. त्यापैकी कलम 354, कलम 375, कलम 376 हे कलम सरकार ने सुरु केले. व त्याची अमलबजावणी सुरु आहे. पण फक्त सरकार एकटेच काही करू शकणार नाही. जोपर्यंत आपण त्या निर्णयाला प्रतिसाद देणार नाही. आपण जर आपला प्रतिसाद दिला तर, नक्कीच हे कोठेतरी थांबू शकेल.

**मुख्य/ सूचनक शब्द :-** भारतीय संस्कृती, बलात्कार समस्या, सरकारी योजना, तंत्रज्ञान.

## १. प्रस्तावना

आपल्या देशाला तत्वज्ञानाची अध्यात्माची महान परंपरा आहे. त्याचा अभिमान आपण कायम बाळगतो. भारतीय परंपरेत स्त्रीला देवीसमान मानले गेले आहे.दुर्गा, काली, लक्ष्मी, सरस्वती ह्या देवता स्त्री रूपच आहेत.

अशी परंपरा असलेल्या देशात स्त्रीची काय विटंबना चालू आहे ! स्वातंत्र मिळून 72 वर्ष लोटली आहेत. स्त्री आज शिक्षण घेऊन सर्व क्षेत्रात अग्रेसर आहे. फक्त चूल आणि मुल याच्याशी तिची प्रतिमा निगडित नाही. प्रयत्नांनी कष्टानी ती स्वावलंबी झाली आहे हे सगळे मिळवून हि ती आज सुरक्षित आहे का?

आज आपण जर पाहिलं तर, असा एकही दिवस नसेल कि वर्तमानपत्रात बलात्काराची किंवा स्त्रियांवरील अत्याचाराची बातमी नसेल. काय बरे करणे असतील ? बलात्काराच्या घटना वाढल्या आहेत कि ? का, धाडसाने महिला पुढे येऊन त्याची वाच्यता करता आहेत असं असेल तर हि चांगली गोष्ट आहे.

तस पाहिलं तर आपल्या भारताची संस्कृती हि पुरुषप्रधान आहे. त्यामुळे महिलांना घरामध्ये दुय्यम स्थान आहे. आज हि परिस्थिती बदललेली आहे, असं जरी म्हटलं तरी हि परिस्थिती पूर्णपणे बदललेली दिसत नाही समाज आजही मुलींना कमजोर आणि एक उपभोगाची वस्तू म्हणूनच पाहत आहे आज आपण पाहतो बलात्कार झालेल्या मुलीला समाज वेगळ्या नजरेने पाहतो, जणू काही तिचीच आहे.

आपण जर साध्याचीच गोष्ट डॉ. प्रियांका रेड्डी तिच्यावर बलात्कार झालेला होता. साधारण हि गोष्ट 29 Nov.2019 ची आहे. तिच्यावर बलात्कार झाल्यावर काहींनी स्टेट्स टाकले, न्याय मिळावा म्हणून मागणी केली, वगैरे. पण जेव्हा तिच्या गाडीची टायर पंचर केली गेली, तिच्यावर जबरदस्ती करण्याचा करण्याचा प्रयत्न

केला गेला, तेव्हा तिथून कोणीच गेलं नसेल काय? एकही गाडी तिथून गेली नसेल काय ? एवढा उशीर पण झाला नव्हता कि तिथून कोणीच जाऊ शकणार नाही. ह्याचाच अर्थ असा होतो कि आपण घटना झाल्यावर सतर्क होतो, आणि सरकारला नावे ठेवण्यात गुंग होतो. इथे भारतीय नागरिक म्हणून जबाबदारी नाही का?

मग यावर सरकारने काही केले नाही का ? केले हि काही कायद्यांमध्ये बदल केले. मुलींना सक्षम करण्यासाठी निर्भया पथक, दामिनी पथक सुरु केले

आणि त्या कलमानुसार,

| कलम 354 | कलम 375 | कलम 376 |
|---|---|---|
| 1- स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हमला किंवा फौजदारी बलप्रयोग करणे.<br>2- लैंगिक छळवणूक व लैंगिक छळवणुकीसाठी शिक्षा<br>3 - छुपा पाठलाग करणे | 1- तीच्या इच्छेविरुद्ध जबरदस्ती करणे.<br>2- तिच्या संमतीने, जेव्हा तिची संमती, तिला किंवा ती ज्या व्यक्तीशी हितसंबंधित आहे अशा कोणत्याही व्यक्तीस, मृत्यूची किंवा दुखापत करण्याची भीती दाखवून मिळविण्यात आली असेल तेव्हा ;<br>3- जेव्हा ती संमती कळविण्यास असमर्थ असेल तेव्हा ; | 1- बलात्कारासाठी शिक्षा :<br>अ. पीडित व्यक्तीची मृत्यू घडवून आणल्याबद्दल किंवा पीडित व्यक्तीस कायमस्वरूपी गलितगात्र स्थितीत ठेवण्यास कारणीभूत झाल्याबद्दल शिक्षा.<br>ब. फारकतीच्या कालावधीत पतीने आपल्या पत्नीशी लैंगिक संभोग करणे<br>क. महिलेबरोबर लैंगिक संभोग केल्याबद्दल शिक्षा.<br>ड. टोळीकडून शिक्षा. |

(साधन : प्रमुख फौजदारी कायदे या पुस्तकातून)

वरील कलम " भारतीय दंड संहिता",1860 या अंतर्गत येतात. त्या मध्ये कलम 354, कलम 375, कलम 376, या मध्ये बदल करून, कलम चालू केले आहेत.

एवढे करूनही आपण सरकारला नावे ठेवण्यात गुंग राहतो, मात्र आपण त्या कोणत्याही योजनांना पाठिंबा देत नाही. योग्य तो प्रतिसाद सुध्या समाज योग्य पद्धतीने करत नाही.



मग याला जबाबदार कोण ?? समाज, सरकार, कि होणारे संस्कार.

मग यासाठी काय करायला हवं, कोठेतरी सरकारने आपले निर्णय कठोर घेऊन लवकरात - लवकर अमंलबजावणी करायला पाहिजे. समाजाने आपले विचार बदलण्याची गरज आहे. आपले आचार - विचार बदलण्याची आता वेळ आलेली आहे.

खरंच आता, विचार करण्याची गरज आहे कि, आपल्या मुली सुरक्षित आहेत काय??

**२. उद्देश :**

१. भारतातील वाढत्या बलात्काराची संख्यावर अभ्यास.

२.भारतातील राज्यामधील होणाऱ्या बलात्काराचे मूल्यमापन करणे.

३.सरकारने बलात्कार रोखण्यासाठी राबवलेल्या योजनांचा अभ्यास करणे.

**३. संशोधनाची पद्धत**

या संशोधन पेपरमध्ये संशेधकाने प्राथमिक माहिती व दुय्यम माहिती या संशोधन पद्धतीचा वापर केला आहे

**1. प्राथमिक माहिती :-**

संशोधकाने प्राथमिक माहितीसाठी, नमुना पद्धत आणि प्रश्नावली साधनांचा वापर केला आहे

**2. दुय्यम माहिती:-**

दुय्यम माहिती हि संशोधकाने खालील साधनांचा वापर करून एकत्र केला आहे. इंटरनेट, वेबसाईड, संशोधन पेपर, वर्तमानपेपर, इत्यादी.

**नमुना पद्धत-**

संशोधकाने 50 स्त्रिया आणि 50 पुरुष या संशोधन पेपर साठी घेतले आहेत. RANDAM SAMPLING METHOD वापरून नमुना निवडले आहे. यामध्ये संशोधकाला सर्वे पद्धतीचा वापर केला.

**४. विश्लेषण**

**टेबल नं. १**

**वर्षानुसार भारतातील बलात्काराची वाढती आकडेवारी**

| वर्ष | बलात्कार करणाऱ्याची आकडेवारी (2010 - 2017) |
|---|---|
| 2009 - 10 | 22,172 |
| 2010 - 11 | 24,206 |
| 2011 - 12 | 24,923 |
| 2012 - 13 | 33,707 |
| 2013 - 14 | 36,735 |
| 2014 - 15 | 34,651 |
| 2015 - 16 | 38,947 |
| 2016 - 17 | 33,658 |

**(साधन :** इंटरनेट)

वरील टेबल क्र. 1 वरून असे लक्षात येते कि, बलात्कारणाऱ्याची संख्या दिवंसेदिवस वाढत चालली आहे. जर आपण तसं पाहिलं तर मागील 10 वर्षाचा अढावानुसार 2009 - 10 पासून ते 2016 - 17 पर्यंत हि आकडेवारी 11458 एवढी वाढली आहे. म्हणजेच 51.68 % नी बलात्काराची करणाऱ्याची संख्या वाढली आहे. मग यामध्ये सरकार कमी पडत आहे कि समाज ? ह्याचा विचार करणे गरजेचे आहे.

**टेबल नं. २**

**बलात्काराला जबाबदार कोण त्याबद्दलची लोकांची घेतलेली मते**

| बलात्काराला जबाबदार | स्त्रीयाकडून आलेली मते | पुरुषाकडून आलेली मते |
|---|---|---|
| महिला / स्त्रीया | 05 | 07 |
| पुरुष | 10 | 06 |
| तंत्रज्ञान | 20 | 25 |
| समाज | 15 | 12 |
| एकूण | 50 | 50 |

**(साधन :** सर्वे पद्धतीचा वापर केला)

वरील टेबल क्र. 2 वरून असे लक्षात येते कि 10 % स्त्रिया आणि 14 % पुरुष हे स्त्रियांना जबाबदार मानतात. कारण आजकालची फॅशन, छोटे - छोटे कपडे यामुळे त्याच्यावर बलात्कार होतो. नंतर 20 % महिला व 12 % पुरुष हे पुरुषांना जबाबदार मानतात, कारण पुरुषाचं वाढत आकर्षण, त्याच्यावर होणारे संस्कार.

मात्र सर्वात जास्त प्रमाण तंत्रज्ञानाला जबाबदार मानताना दिसते, त्यापैकी 40% महिला व 50% पुरुष असे मानतात कि, आजकालच युग हे तंत्रज्ञानाच झाल्यामुळे आता नको त्या वयात नको ते पाहतात व त्याचा दुष्परिणाम म्हणून आहे कृत्य घडताना दिसते तसं म्हंटल तर आजच्या पिढीला तंत्रज्ञानाचा व्यसन लागलं आहे आणि 30% महिला आणि 24 % पुरुष हे समाज्याला दोषी मानतात कारण आज समाज्याने " वैज्ञानिक सृष्टी स्वीकारली आहे पण वैज्ञानिक दृष्टी स्वीकारली नाही " समाज फक्त नावे ठेवण्यात गुंग आहे बलात्कार पीडित मुलीला पाठींबा न देता, तिला नावे ठेवण्यात, तिला जणू वाळीत टाकल्यासारखे वागणे.यामुळे ते समाजाला दोषी मानतात.

VOL- VII | ISSUE- I | JANUARY | 2020 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 6.293 | ISSN 2349-638x

### टेबल नं. ३
### भारतातील प्रसिद्धीत राहिलेले बलात्कार प्रकरणे

| पीडित मुलीचे नाव | पिडीत मुलीचे वय | बलात्कार करणाऱ्याचे नाव आणि वय |
|---|---|---|
| निर्भया कांड ( 16/12/2012) | 23 | मुकेश – 32<br>रामसिंग - 32<br>विनय शर्मा - 26<br>पवन गुप्ता - 24<br>अक्षय ठाकूर - 33 |
| कोपर्डी ( 13/07/2016 ) | 15 | जितेंद्र उर्फ बाबू लाल शिंदे - 25<br>संतोष गोरख भावळ - 30<br>नितीन गोपीचंद भैलुमे - 26 |
| डॉ. प्रियांका रेड्डी ( 29/11/2019 ) | 26 | एम.डी.अरिफ (लॉरी ड्राइवर ) - 26<br>जोल्लू नवीन - 20<br>जोल्लू शिवा - 20<br>चेन्नकेशवुलु - 20 |

**(साधन :** वर्तमानपेपर, जुने साप्ताहिक, आणि इंटरनेटचा वापर केला आहे)


वरील माहिती हि काही प्रसिद्ध झालेल्या केसेस ची माहिती घेतलेली आहे. त्यामध्ये निर्भया कांड, कोपर्डी, डॉ. प्रियांका रेड्डी अशा तीन केसेस ची माहिती घेण्यात आलेली आहे.

आपण जर या माहितीकडे नीट लक्ष देऊन पाहिलं तर असं लक्ष्यात येते कि, ज्या वयामध्ये त्यांनी त्याच्या उज्ज्वल भविष्याकडे लक्ष द्यायला पाहिजे, त्या वयात ते हे असे कृत्य करत आहेत. बलात्कार करणाऱ्याचे वय पहिले तर असे लक्षात येते कि, साधारण 20 - 30 वयोगटातील हि, असे कृत्य करताना काही वाटलं नसेल का ? याला कारण काय, तर हि तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेली, व्यसनग्रस्त असलेली हि असे कृत्य करतात.

मग यासाठी सरकारने काय केले पाहिजे ? बलात्काराचा गुन्हा सिद्ध झालेल्या आरोपीना लवकरात लवकर शिक्षा दिली पाहिजे. नाहीतर 08 वर्षे झाली आज निर्भया कांड ला तरीही सरकार अजून शिक्षा देत आहे असे नको व्हायला पाहिजे.

लवकरत लवकर शिक्षा, न्याय दिला पाहिजे. आणि ह्या प्रकारच्या घटना समाजामध्ये कमीत कमी किंवा घडणार नाहीत, यावर आपण सर्वांनी अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे.

### चार्ट १
### विभाजन : सुरक्षित आणि असुरक्षित राज्ये




**(साधन :** https://www.google.com/search?)

वरील माहिती नुसार असे लक्षात येते कि, सर्वात जास्त बलात्काराच्या घटना ह्या मध्य प्रदेश, छत्तीसगढ, उत्तर प्रदेश ह्या ठिकाणी आहेत. कारण तेथील असलेली सामाजिक परिस्तिथी आणि विचार. तसं पाहिलं तर आज अशी परिस्तिथी आहे कि, महिलांना किंवा मुलींना घराच्या बाहेर पडणं कि अशक्य आहे आणि काही अशा हि घटना घडल्या आहेत कि, मुलगी जन्मली टाका मारून. का ? आणि कशासाठी ?. फक्त एवढेच कि, ते आपले विचार बदलू नाही शकत.


आणि आपल्याच देशातील अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, नागालँड हि राज्ये सुरक्षित राज्ये म्हणून ओळखली जातात. कारण हि राज्ये पर्यटकांना आकर्षित

करणारी आहेत. त्यामुळे त्याच्या विचारामध्ये बदल झालेले आहेत. मुलगा - मुलगी याना समान वागणूक दिली जाते. आणि महत्वाची गोष्ट म्हणजे, तिथे मुलींना सन्मान दिला जातो. आपल्याकडे अशी पद्धत आहे कि, लग्नानंतर मुलगी मुलग्याकडे जातेपण येथे मुलगा मुलीच्या घरी जातो, लग्नानंतर हि पुरुषप्रधान संस्कृती येथे मोडताना दिसते.

यासगळ्या माहितीवरून असा प्रश्न उभा राहतो कि, हि परस्थिती बदलू शकणार नाही का ? मग ह्या साठी काय केले पाहिजे. जेथे बलात्काराच्या घटना जास्त आहेत, तिथे सरकारनं काही केलं नाही का ? समाजाची कोणती जबाबदारी नाही का ? ह्या सगळ्याचा विचार करणे गरजेचे आहे. आज असुरक्षित राज्यांनी सुरक्षित राज्याचा आढावा घेऊन आपलं राज्य सुरक्षित करण्याकडे भर दिला तर नक्कीच हा देश विकसित होईल.

**चार्ट नं. २**

**पिडीतांचे गुन्हेगार यांच्यासोबत असलेलेसंबंध**




**(साधन : https://www.google.com/search?)**

वरील चार्ट क्र. २ वरून आपल्याला असे कळते कि, आपल्या देशात होणाऱ्या मुलीवर बलात्कारापैकी, 22% हे त्याचे मित्रच असतात. 19% हे आपल्या ओळखीतलेच असतात. 4% हे अनोळखी असतात. एवढेच नव्हे तर काही केसेस अशा आढळलेल्या आहेत कि, 9% हे त्याच्याच जोडीदाराने केलेल्या आढळल्या आहेत. आणि सर्वात जास्त प्रमाण हे स्त्रियांना, मुलींना प्रेमात पाडणं, लग्नाचं आमिष दाखवणे आणि तिच्यावर बलात्कार करणे ह्याचे प्रमाण जवळपास 46% आहे.

आज खरंच कोणत्याही गोष्टीच्या आहारी न जात. डोळसपने पाहणे गरजेचं आहे कारण समाजामध्ये जर बलात्कार करणाऱ्याचे प्रकार एवढे असेल तर, आज आपल्या मुली, बहिणी, आई खरंच सुरक्षित आहे काय ओ?

**५. निष्कर्ष :-**

वरील माहिती वरून संशोधकला असे वाटते कि, समाजाने बलात्कार पीडितांना सहानभूती दाखवली पाहिजे तिच्या पूर्वसनासाठी मदत केली पाहिजे. न्याय व्यवस्थेने हि तिला लवकरात - लवकर न्याय कसा मिळेल ते बघितले पाहिजे. आरोपीना लवकरात - लवकर अशी शिक्षा मिळाली पाहिजे, कि ज्यामुळे सर्वांना जबर बसेल. समाजाने कायदा हातात घेऊन आरोपीना शिक्षा करणे हा न्याय नव्हे.

तसं पाहिलं तर तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रसारामुळे तरुणपिढी त्याच्या आहारी जात आहे. नको त्या वयात नको त्या गोष्टींना सामोरे जात आहे. योग्य त्या लैगिंक शिक्षणाचा अभाव असल्यामुळे आज आपल्या देशात बलात्काराचे प्रमाण वाढताना दिसते.

हे सगळं थांबवण्यासाठी, याची सुरुवात कुटुंबातूनच व्हायला पाहिजे स्त्रियांना योग्य तो मान - सन्मान, मुला - मुलींमध्ये भेदभाव न करणे, मोठ्याचा आदर - सन्मान करणे. मुलींना अशा प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी कणखरपणे समोर जाण्यासाठी " स्वरक्षणाचे " प्रशिक्षण दिले पाहिजे.

संशोधक असे सांगतात कि, सरकारने सुरु केलेल्या योजनांना समाजाने प्रतिसाद दिला पाहिजे. कारण कि,

सरकारने सुरु केलेल्या योजनांना समाज योग्य तो प्रतिसाद देत नाही. त्यापैकी

Minto App : निर्भया सखी : दामिनी पथक : सुरु केले पण या योजनांना हवा तसा प्रतिसाद दिलेला दिसत नाही. आताच झालेल्या रेड्डी केस नंतर सरकारने प्रतिसाद अँप सुरु केले आहे. Same Minto App सारखेच, पाहूया हि अँप न्याय देऊ शकता का? नाहीतर हि पण अयशस्वी म्हणूनच राहील.

मग असा प्रश्न उभा राहतो कि, याला जबाबदार नक्की कोण ??? जर समाजाने ठरवले तर आज हि परिस्थिती बदलू शकते. आपण फक्त समाजाला दोषी ठरवू शकत नाही. जागी वेळा असेही आढळून आले आहे कि, शासन कोठेतरी अमलबजावणी करण्यास कमी पडत आहे. याचाच अर्थ असा कि, कोठेतरी समाजाचे विचार, शासनाची अमलबजावणी कठोर करणे गरजेचे आहे.

6. **References :**

1. Ramu rawat , June 2015 , Explosion of Rape case in India: study of last one decade, Issn No. 0975 - 833X,Volume No. 07, PP - 17976 - 17984
2. HTTPS://www.google.com/search, Time , 10 am